# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२०

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### नागपूर येथील इंदिरा गांधी शासकीय वैद्यकिय महाविद्यालयातील परिचारिकांची वाढीव पदे भरण्याबाबत

**(१) १७ (१३-०४-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील इंदिरा गांधी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय (मेयो) येथे दरवर्षी ४० खाटांचे एन.आय.सी.यू. तर २० खाटांचे पीआयसीयू असून येथील परिचारिकांची वाढीव पदे भरण्यात आली नसल्याने एनआयसीयू ८ व पी.आय.सी.यू. ४ खाटांचेच असल्याची बाब दिनांक ३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेयो रुग्णालयात सुरु करण्यात आलेल्या एन.आय.सी.यू. मध्ये १६ तर पी.आय.सी.यू. मध्ये ३६ परिचारीकांची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नियोजनबध्द विकास करुन खाटांची संभाव्य वाढणारी संख्या विचारात घेता संस्थेकडून नवीन पदनिर्मितीचा प्रस्ताव तयार करुन वरील कक्षाकरिता स्वतंत्र पदे मंजूर करण्याची कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (३१-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. अधिष्ठाता, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांच्या दिनांक १९.०९.२०१९ रोजीच्या पत्रान्वये एन.आय.सी.यु. करिता ५ व पी.आय.सी.यू. करिता ६ अधिपरिचारिकांची मागणी करण्यात आली आहे.

(३) कोणत्याही रुग्णसेवेकरिता नवीन पदे मंजूर होणे ही दीर्घ कालावधीची प्रक्रिया आहे. सबब, संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या दिनांक २९.०१.२०२० व दिनांक ०५.०३.२०२० च्या आदेशान्वये अन्य संस्थेतील ११ व ९ अशा एकूण २० परिचारिकांच्या सेवा सदर कक्षाकरिता उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

(४) दिनांक ११.०६.२०२० च्या शासन निर्णयान्वये बाह्यस्त्रोतामार्फत मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. सदर पदे भरण्याबाबतची कार्यवाही लवकरच सुरु करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील पानशेत पूरग्रस्त सोसायट्यांना मालकी हक्काने घरे देण्याबाबत

**(२) ११३ (०२-०४-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील पानशेत पूरग्रस्त सोसायट्यांना मालकी हक्काने घरे देण्याचा निर्णय प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पानशेत पूरग्रस्त सोसायट्यांना मालकी हक्काने घरे देण्याबाबत शासनाने दिनांक ८ मार्च, २०१९ रोजी अध्यादेश काढला असून सोसायट्यांनी देखील प्रस्ताव दाखल करुन १० महिन्यांपेक्षा अधिक काळ होऊनही सदर बाब जिल्हा प्रशासनाकडे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच पूरग्रस्त सोसायटयांना मालकी हक्क देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (०२-०९-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) शासन निर्णय दिनांक ८ मार्च २०१९ नूसार एकूण १०३ सोसायट्यांपैकी ९८ सोसायट्यांनी जमिनी मालकी हक्काने मिळणेकामी सादर केलेल्या अर्जानूसार त्यांची स्थळपाहणी करण्यात आली असून त्या प्रकरणांपैकी ६७ प्रकरणी अहवाल तयार करण्यात आला. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पूणे याचे कार्यालयाकडे सन

१९७६ सालचे वार्षिक मुल्य दर तक्ते अस्तित्वात नसल्याने १९७६ सालचे जमीनीचे मुल्यांकन आवश्यकते प्रमाणे नगर रचना व मूल्यनिर्धारण विभागाचा सल्ला अथवा सहाय्य घेऊन पानशेत पुरग्रस्तांच्या प्रकरणी दि.०१/०२/१९७६ रोजीची जमिनीची किंमत निश्चित करुन जिल्हाधिकारी यांना कळविण्याबाबत नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच बऱ्याच भूखंड धारकांनी जमिनीच्या मालकी हक्काबाबत दिवाणी न्यायालयात दावे दाखल केले असून ते न्यायप्रविष्ट आहेत. छाननी करण्यात आलेल्या प्रकरणांमध्ये नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पूणे यांच्याकडे पाठपुरावा करुन मुल्यांकन प्राप्त करुन घेऊन शासन निर्णय दि.०८/०३/२०१९ नूसार कार्यवाही करण्याबाबतच्या सुचना जिल्हाधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.

---

## राजापूर तालुक्यात (जि.रत्नागिरी) अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याबाबत

**(३) २१० (१५-०४-२०२०). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर तालुक्यात (जि.रत्नागिरी) अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम पूर्ण झाले असून त्यामधील तालुक्यातील २३७ गावांमधील सुमारे ८ हजार ९१५ शेतक-यांचे सुमारे १७००.०५ हेक्टर क्षेत्रात भातशेतीचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच अणसुरे व कुवेशी गावातील शेतक-यांच्या नुकसानीचे अद्याप पंचनामेच करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानाचे पंचनामे त्वरीत करुन नुकस्तानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (०३-०९-२०२०) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

राजापूर तालुक्यात (जि.रत्नागिरी) ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१९ मध्ये पडलेल्या अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम पूर्ण झाले असून त्यामधील २३७ गावांमधील ९१६३ शेतकऱ्यांचे सुमारे १८५४.५९ हेक्टर क्षेत्रात भातशेतीचे व फळपिकांचे नुकसान झाले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) रत्नागिरी जिल्ह्यासाठी रू.१५,९७,१२,०००/- इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. त्यापैकी राजापूर तालुक्यातील ९३३५ शेतकऱ्यांना रू.१,७२,७८,६७०/- एवढ्या अनुदानाचे वाटप केलेले आहे. त्यामध्ये मौजे अणुसुरे येथील १८८ व मौजे कुवेशी येथील ८७ शेतकऱ्यांचा समावेश आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिमूर (जि.चंद्रपूर) येथे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय सुरु करण्याबाबत**

**(४) ११०२ (२०-०३-२०२०). श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिमूर (जि.चंद्रपूर) येथे शासन आदेश क्र.प्राफेब-२०१७/व्हीआयपी १४८/प्र.क्र.८७/म-१०, दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ अन्वये अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाची निर्मिती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मंजुर अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय, चिमूरबाबत दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजी सुधारीत आदेश काढण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मंजुर अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय सद्यस्थितीत चंद्रपूर येथूनच अतिरिक्त कार्यभार देवून चालविले जात असून आवश्यक कर्मचारी व अधिकारी नियुक्त करण्याच्या प्रक्रियेबाबत उपाययोजना सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाच्या महसूल व वन विभागाद्वारा दिनांक ९ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना सुस्पष्ट अभिप्रायासह अहवाल सादर करण्यासाठी पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, चिमूर येथे मंजूर झालेले अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय इतरत्र हलविण्याची स्थिती तसेच त्याबाबत स्थानिक प्रशासनात संभ्रम निर्माण होत असल्याने सदर कार्यालय चिमूर येथे सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. बाळासाहेब थोरात (०२-०९-२०२०) :** (१) व (२) मंत्रीमंडळाच्या दिनांक ९ सप्टेंबर, २०१९ च्या बैठकीत प्राप्त मान्यतेनुसार, चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर येथे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करण्यास मान्यता देणेबाबतचा शासन निर्णय क्र.प्राफेब-२०१७ / व्हीआयपी १४८ / प्र.क्र.८७ /म-१० दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ रोजी निर्गमित करण्यात आला असून दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शासन शुद्धीपत्रकान्वये सदर शासन निर्णयात दुरूस्ती करण्यात आली आहे.
(३) होय.
(४) व (५) होय, दिनांक ११ डिसेंबर, २०१९ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीच्या कार्यवृत्ताच्या अनुषंगाने, चिमूर, जि.चंद्रपूर येथे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करण्याची निकड गुणवत्तेच्या आधारे तपासून अभिप्राय सादर करणेबाबत जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना दि. ९.०१.२०२० च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यावरील जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचा अहवाल शासनास प्राप्त झालेला असून प्रकरण शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**नागभीड (जि.चंद्रपूर) तालुक्यात तहसीलदार कार्यालय कार्यकक्षेमध्ये तळोधी (बाळापूर) कार्यक्षेत्रातील २० गावांना सामाविष्ट करण्याबाबत**

**(५) ११४० (२०-०३-२०२०). श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागभीड (जि.चंद्रपूर) तहसील कार्यालयाचे विभाजन करून तळोधी (बाळापुर) अप्पर तहसील कार्यालय निर्माण करतांना सदर कार्यालयाचे अंतर व प्रशासकीय दृष्टीने काही गावांना सोयीचे नसल्याकारणाने सदर गांवे पूर्ववत नागभीड तहसीलदार कार्यालयाच्या कार्यकक्षेमध्ये समाविष्ट करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे दिनांक १७ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तळोधी (बाळापुर) या अप्पर तहसीलदार कार्यालयाच्या कार्यकक्षेतून मिंडाळा, कोसंबी गवळी, किटाळी बोरमाळा या मंडळातील सुमारे २० गावांना वगळण्यासाठीचा जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचा प्रस्ताव दिनांक ९ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनास सादर झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तळोधी (बाळापुर) या अप्पर तहसीलदार कार्यालयाच्या कार्यकक्षेतून सदर २० गावांना वगळून पूर्ववत नागभीड तहसील कार्यालयास जोडण्याबाबत पालकमंत्री चंद्रपूर यांनी देखील दिनांक २९ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्तावास मान्यता देवून त्वरित प्रशासकीय उपाययोजना व कार्यवाही करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२८-०८-२०२०) :** (१) होय.

(२) याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या दि.१७.११.२०१८ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला आहे.

(३) होय.

(४) व (५) तळोधी (बाळापूर) या अप्पर तहसीलदार कार्यालय कार्यकेक्षतून २० गावांना वगळून पूर्ववत नागभीड तहसील कार्यालयास जोडण्याबाबतच्या प्राप्त प्रस्तावात महसुल मंडळांच्या पुनर्रचनेचा आवश्यक तपशिल नसल्याने, सदर माहितीसह फेरप्रस्ताव विभागीय आयुक्त, नागपूर यांच्याकडून मागविण्यात आला आहे.

---

**मंत्रालयातून नवीन प्रशासन भवन, विधान भवन व नियोजित मेट्रो रेल्वे स्थानकावर जाण्यासाठी भुयारी मार्ग बांधण्याबाबत**

**(६) १२३२ (२१-०३-२०२०). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राहूल कुल (दौंड),**

**श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथे मंत्रालयात दररोज हजारो अभ्यागत कामानिमित्ताने येत असून त्यांना याठिकाणी बसण्याची कोणतीही व्यवस्था नसल्यामुळे सदर ठिकाणी अभ्यागतांना बसण्याची व्यवस्था करावी अशी मागणी लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील मंत्रालयाच्या गार्डन गेटजवळ अभ्यागतांना बसण्यासाठी दोन मजली इमारत आणि मंत्रालयातून नवीन प्रशासन भवन, विधान भवन व नियोजित विधान भवन मेट्रो रेल्वे स्थानकावर जाण्यासाठी भुयारी मार्ग बांधण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेचे स्वरुप काय आहे, सदरहु योजनेचा अंदाजित खर्च किती आहे व प्रत्यक्षात कामाला केव्हा सुरुवात होणार आहे व किती कालावधीत हे काम पूर्ण करण्यात येणार आहे व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२२-०७-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) मंत्रालय ते नवीन प्रशासकीय इमारत ते विधान भवन ते नियोजित विधानभवन मेट्रो रेल स्थानकापर्यंत ३८० मीटर भुयारी मार्ग बांधणे व मंत्रालय गार्डन भागात भूमिगत दुमजली वाहनतळ, नवीन कार्यालयीन इमारतीचे बांधकाम व इतर अनुषंगिक सुरक्षा कामे करणे इ., असे कामाचे स्वरुप आहे.

सदर योजनेला माहे जून, २०१९ मध्ये रु.४००.०० कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत आली आहे.

प्रवासी भुयारी मार्गाचे बांधकाम सुरक्षा यंत्रणेसह मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन लि., मुंबई यांच्यामार्फत करण्यात येणार असून सद्य:स्थितीत मंत्रालय परिसरातील १०४, नवीन प्रशासकीय इमरतीच्या वाहनतळ परिसरातील ६४ पाईल्सचे काम पूर्ण करण्यात आले असून पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कृष्णा खो-यात अतिवृष्टीमुळे आलेल्या पुराचे नियंत्रण करण्यासाठी "आरटीडास" या अत्याधुनिक यंत्रणेचा वापर केला नसल्याबाबत

**(७) १५१६ (११-०४-२०२०). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णा खो-यात सहा वर्षापुर्वी अतिवृष्टीमुळे आलेल्या पुराचे नियंत्रण करण्यासाठी सुमारे पाच कोटी रुपये खर्चुन पुण्यात बसवण्यात आलेल्या “आरटीडास“ (रियल टाईम डेटा ॲक्विझिशन सिस्टीम) या अत्याधुनिक यंत्रणेचा वापर जलसंपदा विभागातील अधिकाऱ्यांनी केला नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात हानी झाली असल्याने तात्कालीन जलसंपदा मंत्री यांनी दोषी अधिका-यांवर कारवाई करण्यात येईल असे आश्वासन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत किती अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली, कारवाईचे स्वरूप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०४-०९-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालवण दांडी (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथे सेल्फी काढतांना पर्यटकाचा झालेला मृत्यु**

**(८) १६५३ (२२-०३-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण दांडी (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथे समुद्रात पॅरासिलींग करतेवेळी सेल्फी काढतांना एका पर्यटकाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला असल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारंवार अशा घटना घडण्याची कारणे काय आहेत तसेच अशा घटनांना प्रतिबंध करण्याच्या दृष्टीकोनातून शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (०२-०९-२०२०) :** (१) होय.

(२) सागर किनारी पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने समुद्र किनारी उचित उपाययोजना होणेबाबत मुख्याधिकारी, मालवण व बंदर निरीक्षक, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड मालवण यांचेशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईत अनेक शिधावाटप दुकानांमध्ये अन्नधान्याची कृत्रिम टंचाई निर्माण झाल्याबाबत**

**(९) १७४६ (१४-०४-२०२०). श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अनेक शिधावाटपाच्या दुकानांमध्ये अन्नधान्याची कृत्रिम टंचाई निर्माण झाली असून शासनाच्या गोदामातून दुकानांपर्यंत धान्य पोहोचविण्यासाठी नियुक्त करण्यात आलेले वाहतूकदार वेळेत माल घेत नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२५-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पुणे जिल्हा परिषदेत वैयक्तिक लाभाच्या योजनांमध्ये केलेले अर्ज प्रलंबित असल्याबाबत

**(१०) १७५८ (१५-०४-२०२०). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हा परिषदेत वैयक्तिक लाभाच्या योजनांतर्गत केलेले अर्ज प्रशासनाच्या दिरंगाईमुळे मोठ्या प्रमाणावर प्रलंबित असल्याचे दिनांक १२ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, शासनाने या वैयक्तिक लाभाच्या (डीबीटी) योजनांच्या अर्जाची छाननी करुन पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०२-०९-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) पुणे जिल्हा परिषद स्वनिधीच्या अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार कृषी, समाजकल्याण, पशुसंवर्धन, महिला व बाल कल्याण विभागांमार्फत वैयक्तिक लाभाच्या योजना डी.बी.टी.द्वारे राबविण्यात येत आहेत. सदर योजनामधून मंजूर निधीच्या मर्यादेत जिल्हा परिषदेच्या संबंधित विषय समित्यांनी लाभार्थ्यांची निवड करुन एकूण ३७,९६८ लाभार्थ्यांना मंजुरी दिलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### अकोला (जि.अकोला) शहरात अनधिकृतरीत्या तांदूळ वाहून नेणारा ट्रक पकडल्याबाबत

**(११) १७९३ (२२-०३-२०२०). श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला (जि.अकोला) शहरात गस्तीवर असलेल्या खदान पोलीसांनी संशयास्पद जाणा-या ट्रकला अडवून तपासणी केली असता २४ क्विंटल ५१० किलो तांदूळ आढळून आले परंतु त्याबाबतची कोणतीही कागदपत्रे नसल्याने दिनांक २० डिसेंबर, २०१९ रोजी ट्रक जप्त करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ट्रकचालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानूसार ट्रक चालक व मालकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (०२-०९-२०२०) :** (१) व (२) पो.स्टे. खदान अकोला येथे दिनांक २०/१२/२०१९ च्या रात्री भरधाव जाणाऱ्या ट्रकचा संशय आल्याने गस्तीवर असणाऱ्या पोलीसांनी ट्रक ची तपासणी केली असता त्यात रुपये ६,७९,०००/- किंमतीचे ५० किलो वजनाचे ४८५ कट्टे आढळून आले. नमुद मालाबाबत चालकाजवळ कोणतेही कागदपत्र नसल्याने सदर तांदूळ रेशनचा असण्याची शक्यता असल्याने नमूद माल ट्रकसह जप्त करुन चालक व मालकाविरुध्द पो.स्टेशन खदान येथे दिनांक २०/१२/२०१९ रोजी अप.क्र.६९८/१९ कलम ४२० भादंवि सह कलम ३,७ ई.सी. ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद दाखल करुन अटक करण्यात आली आहे.
(३) आरोपींविरुध्द दिवाणी न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्याइतपत पुरावा उपलब्ध असल्याने दोषारोप पत्र क्र.९४/२०२०, दिनांक २०/०७/२०२० अन्वये तयार करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विविध अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयातील अनुसूचित जाती व इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(१२) १८२४ (०३-०४-२०२०). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २००८-०९ मध्ये विविध अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांमध्ये अनुसूचित जाती व इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती मध्ये २ हजार १७४ कोटी रूपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गैरव्यवहार निदर्शनास आल्यानंतर अनेक महाविद्यालये बंद पडली असून, या शिष्यवृत्तीतील गैरव्यवहारामुळे राज्याचा अर्थसंकल्प ६-७ वर्षात १ हजार कोटीहून साडेसात हजार कोटीवर गेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त गैरव्यवहाराची चौकशी संथगतीने सुरु असल्याने, सदरहू चौकशी तातडीने पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (३१-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.

भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती वाटपातील अनियमिततेबाबत विशेष चौकशी पथकाने सादर केलेल्या अंतिम चौकशी अहवालातील लेखा परीक्षणाच्या आकडेवारीची पडताळणी समाज कल्याण आयुक्तालया मार्फत पूर्ण करुन, त्याबाबतचा अनुपालन अहवाल गृह विभागास सादर करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**परभणी जिल्ह्यातील शहरी भागात असणा-या अंगणवाड्यापैकी जवळपास ९५ टक्के अंगणवाड्या भाड्याच्या इमारतीत सुरु असल्याबाबत**

**(१३) १९५५ (२५-०३-२०२०). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील शहरी भागात असणा-या अंगणवाड्यांपैकी जवळपास ९५ टक्के अंगणवाड्या भाड्याच्या इमारतीत सुरु असल्याची बाब अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत केलेल्या पाहणीत उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील ग्रामीण भागातील अनेक अंगणवाड्यांमध्ये शौचालयांची सुविधा सुध्दा उपलब्ध नसल्याचीही बाब या पाहणी अहवालात उघडकीस आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील सर्व अंगणवाड्यांसाठी वर्ग खोल्या व शौचालये बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (०३-०९-२०२०) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
(३) व (४) राज्यातील ज्या अंगणवाड्यांना स्वत:च्या इमारती उपलब्ध आहेत अशा सर्व अंगणवाडी केंद्रामध्ये शौचालय बांधण्यासाठी निधी देण्याची योजना सन २०१८-१९ पासून सुरु करण्यात आली आहे व या योजनेअंतर्गत ७३६५ अंगणवाडी केंद्रांना तसेच सन २०१९-२० या वित्तीय वर्षात ३२७९ अंगणवाडी केंद्रांना शौचालय बांधण्यासाठी निधी वितरीत करण्यात आला आहे.याप्रमाणे निधीच्या उपलब्धतेनुसार अंगणवाडी केंद्रांना शौचालय बांधण्यासाठी निधी देण्यात येणार आहे.

---

**पटवर्धन कुरोली (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील भीमा नदीला आलेल्या पुराच्या पाण्याने पिकांसह वाहून गेलेल्या जमीनीच्या नुकसानीबाबत**

**(१४) १९७६ (१५-०४-२०२०). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील भिमा नदीला आलेल्या पुरामुळे ३० पेक्षा अधिक गावे बाधीत झाली असून शेतकऱ्यांच्या ऊस, केळी, डाळींब, कडवळ, मका आदी पिकांचे तसेच शेतजमिनीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची बाब माहे ऑगस्ट-ऑक्टोबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिवृष्टीमुळे सुमारे १ लाख ७३ हजार ५५५ हेक्टरवरील जिरायती व बागायती तसेच ६८ हजार ८६८ हेक्टरवरील फळपिकांच्या नुकसानीसाठी शासनाने अतिवृष्टीग्रस्ताना एकूण १८४ कोटी निधी मंजूर केला आहे, हे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, निधी प्राप्त होऊन दोन महिन्याचा कालावधी झाला तरीही शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा झालेली नसल्याने कामात हलगर्जीपणा केल्याबद्दल जिल्हाधिकारी कार्यालयाने संबंधित अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीसा दिल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाकडून उक्त प्रश्नी चौकशी करण्यात आलेली आहे काय, तद्नुसार चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(५) असल्यास, दोषी असणाऱ्यांवर तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (०३-०९-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सोलापूर जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झालेल्या बाधित शेतक-यांना रू.२०,२६,५५,७११/- इतका निधी वितरीत करण्यात आला होता.

(३) हे खरे आहे.

बाधित शेतक-यांना नुकसानीची मदत निधी वाटप करण्यासाठी जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी तहसिलदार पंढरपूर यांना रूपये ८,६३,३२,०००/- निधी उपलब्ध करून दिला होता. सदर निधी तहसिलदार पंढरपूर यांच्या बीडीएस प्रणालीवर शिल्लक दिसत असल्याने दिनांक २०.०१.२०२० रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाने कारणे दाखवा नोटीस दिली होती.

(४) पंढरपूर तालुक्यात माहे ऑगस्ट, २०१९ च्या पहिल्या आठवडयात पूरस्थिती निर्माण होऊन एकूण ३० पेक्षा अधिक गावातील २७३६.११ क्षेत्राकरिता एकूण ७६५ खातेदारांना रूपये ८,६३,३२,०००/- इतक्या निधीचे वाटप पूर्ण करण्यात आले आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे मार्गताम्हाने (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील तरुणाचा बंदुकीची गोळी लागून मृत्यू झाल्याबाबत**

**(१५) २००६ (२२-०३-२०२०). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मार्गताम्हाने (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील सिद्धेश संतोष गुरव या तरुणाचा सहकाऱ्यांसोबत मौजे देवघर (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथे शिकारीला गेलेला असताना बंदुकीची गोळी लागून मृत्यू झाल्याची घटना दिनांक ४ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मृत्यूबाबत घातपाताचा संशय मौजे मार्गताम्हाने येथील ग्रामस्थांनी व्यक्त केला असून अनेक व्यक्तींनी तशी माहिती पोलीस निरीक्षक, गुहागर यांना दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने तसेच अटक करण्यात आलेल्या संशयितांच्या चौकशीतून या गुन्ह्यातील मुख्य सुत्राधारांचा शोध घेऊन त्यांच्यावर पोलिसांनी कारवाई केली आहे काय,

(४) नसल्यास, गुन्हेगारांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर व संबंधित दोषींवर शासन फौजदारी कारवाई करणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (०४-०९-२०२०) :** (१) होय.

(२) नाही.

(३) ३ आरोपींना अटक करण्यात आली असून मयत व अटक आरोपी व्यतीरीक्त गुन्ह्याच्या घटनाठिकाणी इतर कुणीही हजर नसल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. गुहागार पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. ८३/२०१९ भा.द.वि.क. ३०४, ३४ भारतीय हत्यार अधिनियम कलम ३/२५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

(४) सदर गुन्ह्यामध्ये मुख्य सुत्रधार अस्तित्वात नसल्याने कोणत्याही गुन्हेगाराला पाठीशी घालणा-या अधिका-यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयात महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियानामध्ये बचत गटांना फिरता निधी वाटप करण्यास बँकांनी असमर्थता दाखवली असल्याबाबत**

**(१६) २१२८ (१५-०४-२०२०). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील हिंगोली जिल्हयात महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियानामध्ये बचत गटांना फिरता निधी वाटप करण्यास बँकांनी असमर्थता दाखवली असल्याने जिल्हयातील बचत गट अडचणीत आले असल्याची बाब उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बचत गटाची नोंदणी झाल्यानंतर या गटाला फिरता निधी देण्याची शिफारस जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून केली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चालू आर्थिक वर्षातील तीन महिन्यात बचत गटात फिरता निधी बँकांनी दिला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, तदनुषंगाने महिला बचत गटांना फिरता निधी तात्काळ देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०२-०९-२०२०) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) शासनाकडून प्राप्त उद्दीष्टांच्या ९८ टक्के बचत गटांना फिरता निधी वाटप करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी बालभवन योजना राबविण्याबाबत**

**(१७) २१६२ (०८-०४-२०२०). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ७० प्राथमिक शाळांमधील ३ हजार २४८ विद्यार्थ्यांसाठी बालभवन योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील कोणत्या जिल्हा परिषद शाळांमध्ये बालभवन योजना राबविण्याचे ठरले आहे,
(३) असल्यास, या योजनेचे स्वरूप काय आहे व जिल्हा परिषद शाळांच्या निवडीचे निकष काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०२-०९-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) शासनाने सन १९७४-७५ पासून जिल्हा बालभवन योजना सुरु केली आहे. सदर योजना जिल्हा परिषद शाळांमध्ये राबविण्यात येत नसून, स्थानिक खाजगी संस्थेकडून राबविण्यात येते.

---

**सुधागड (जि.रायगड) तालुक्यात ३० अंगणवाड्या इमारतीपासून वंचित असून १८ अंगणवाड्याची अक्षरशः दुर्दशा झाली असल्याबाबत**

**(१८) २१७५ (२५-०३-२०२०). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुधागड (जि.रायगड) तालुक्यात अस्तित्वात असलेल्या ११७ अंगणवाड्यांमध्ये एकूण मुलांची पटसंख्या ६ हजाराहून अधिक असून बालविकास विभागाच्या अयोग्य कारभारामुळे व अपु-या सोयीसुविधांमुळे पटसंख्या दिवसेंदिवस कमी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुधागड तालुक्यात आजमितीस ३० अंगणवाड्या इमारतीपासून वंचित असून १८ अंगणवाड्याची अक्षरशः दुर्दशा झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानूसार अंगणवाड्या सुस्थितीत ठेवणेबाबत तसेच सर्वच अंगणवाड्यांना स्वतःच्या सुसज्ज इमारती उभारण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (०३-०९-२०२०) :** (१) हे खरे नाही.

सुधागड तालुक्यातील अंगणवाड्यांमधील बालकांची एकूण पटसंख्या ५३३७ इतकी आहे. तालुक्यातील बहुतांशी भाग हा स्थलांतरग्रस्त असल्यामुळे अंगणवाडीतील लाभार्थ्यांच्या उपस्थितीच्या प्रमाणामध्ये काही प्रमाणात वाढ किंवा घट होत असते तथापि अंगणवाडीतील बालकांना योजनेचा पुरेपुर लाभ देण्यात येउन सर्व सोयी सुविधा पुरविण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

एकात्मिक बाल विकास सेवा योजना, सुधागड पाली, जि.रायगड या प्रकल्पामध्ये एकूण १५६ अंगणवाडी केंद्र कार्यान्वीत आहेत. त्यापैकी १२६ अंगणवाडी केंद्रांच्या स्वत:च्या इमारती आहेत. प्रकल्पातील एकूण ३० अंगणवाडी केंद्रांना इमारती नसून त्यापैकी १२ अंगणवाडी केंद्र धोकादायक असल्याने बालकांचे सुरक्षेच्या दृष्टीकोनांतून पर्यायी व्यवस्था म्हणून समाज मंदीर, प्राथमिक शाळा व भाड्याच्या इमारतीत अंगणवाडी केंद्र सुरू आहेत.

(३) व (४) सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये DPDC मधून नवीन अंगणवाडी बांधकामासाठी रु.५.०० कोटी वाढीव निधीची मागणी केली आहे. सदरचा निधी प्राप्त होताच सुधागड तालुक्यातील अंगणवाड्यांना प्राधान्याने मंजूरी देण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

---

## नांदुरा (जि.बुलढाणा) तालुक्यातील जिगाव प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(१९) २२२८ (२७-०३-२०२०). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदुरा (जि.बुलढाणा) तालुक्यात सुरु असलेल्या जिगाव प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना मिळाला नसल्याची बाब दिनांक १५ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत अनेक वर्षापासून सुरू असलेल्या प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला न मिळाल्यामुळे सदर शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रती तीव्र असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिगाव, प्रकल्पबाधितांना जमिनीचा मोबदला अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (३१-०८-२०२०) :** (१), (२) व (३) जिगाव सिंचन प्रकल्पासाठी बुलढाणा जिल्ह्यातील ६ भूसंपादन अधिकारी यांचेकडे भूसंपादन प्रकरणे सुरु आहेत. नवीन भूसंपादन अधिनियम, २०१३ च्या अंतर्गत सदर प्रकरणे कार्यवाहीखाली आहेत.

संबंधित भूसंपादन अधिकारी यांचेकडून आतापावेतो जिगांव प्रकल्पाशी संबंधित ५५ भूसंपादन प्रकरणात ५८६० भूधारकांना रु.५८८.४१ कोटी भूसंपादन मोबदला अदा करण्यात आलेला आहे.

तसेच शासन निर्णय, महसुल व वन विभाग, दि. ३० मार्च, २०१६ नुसार भूसंपादनाचा आगाऊ मोबदला म्हणून ४८८ भूधारकांना सुमारे रू.२४.५७ कोटी मंजूर करण्यात आले आहेत.त्यामुळे शासनाप्रती असंतोष निर्माण होण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. उर्वरित प्रकरणी अंतिम निवाडा घोषित करून संबंधित भूधारकांना मोबदला वाटप करण्याची दक्षता संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदुरा (जि.बुलढाणा) येथे अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू करण्याबाबत

**(२०) २२७४ (०६-०४-२०२०). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदुरा (जि.बुलढाणा) येथे अल्पसंख्याक विद्यार्थी विद्यार्थिनींची संख्या मोठ्या प्रमाणात असून नांदुरा येथे अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे वसतीगृह नसल्याने विद्यार्थ्यांची शिक्षणाची गैरसोय होत असल्याची बाब दिनांक ३० ऑक्टोबर २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदुरा येथे अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू करण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नांदुरा येथे अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू करणे बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नवाब मलिक (०२-०९-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

बुलडाणा जिल्हया अंतर्गत नांदुरा तालुक्यामध्ये एकूण १०३९३ अल्पसंख्याक समुदायाचे विद्यार्थी असून ग्रामीण भागात अल्पसंख्याक समुदाय बहुल वस्ती असलेल्या गावातील उर्दू माध्यमाच्या शाळांमध्ये २५८३ इतकी पटसंख्या आहे. या शाळांतील उर्दू माध्यमाचे विद्यार्थी पुढील शिक्षणासाठी नांदुरा येथे ये-जा करतात. नांदुरा येथे अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह नाही.

(२), (३) व (४) प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रम या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत नांदुरा गटाचा समावेश सन २०१८ मध्ये केंद्रशासनामार्फत नव्याने करण्यात आला आहे. नांदूरा येथे अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह बांधकामाचा कोणताही प्रस्ताव अद्यापि शासनास प्राप्त झालेला नाही.

---

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेंतर्गत प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत**

**(२१) २७८४ (२०-०३-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेंतर्गत प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी, बल्लारपूर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्याससुमारास लेखी निवेदन सादर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेंतर्गत प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०२-०९-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजने अंतर्गत श्री.जयदेव यादवराव लभाणे मु.पो.टेंभुर्डा, तालुका वरोरा, जिल्हा चंद्रपुर यांना सन २०१८-१९ इनवेल बोअरींग, पंपसंच, तुषार सिंचन संचमंजूर असून पंप संच व तुषार सिंचन संचाचा लाभ दि.१३/१२/२०१९ रोजी देण्यात आला आहे.

तसेच लाभार्थीनी इनवेल बोअर न खोदल्यामुळे त्यांना लाभ देण्यात आलेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बंदरांवर आवश्यक सोयीसुविधांची उपलब्धता करून देण्याबाबत**

**(२२) २८५१ (१३-०४-२०२०). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई ते गोवा अशी समुद्रातून सुरू असलेल्या क्रुझला रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुठेही थांबा देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बंदरांवर आवश्यक सोयीसुविधांचा अभाव असल्याने थांबे देण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, क्रुझला थांबे मिळण्यासाठी आवश्यक सोयीसुविधांची उपलब्धता करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख (२१-०८-२०२०) :** (१), (२) व (३) रत्नागिरी जिल्ह्यात आंग्रे बंदर, जयगड येथे मुंबई-गोवा क्रूझला ऑक्टोबर-२०१९ पासून थांबा देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे

रत्नागिरी जिल्ह्यातील भगवती बंदर येथे अंतर्देशिय क्रूझ टर्मिनल उभारण्याच्या प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आंजी (ता.राळेगांव, जि.यवतमाळ) येथे महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना व स्वच्छ भारत मिशन अंतर्गत शौचालय बांधकामात झालेला गैरव्यवहार**

**(२३) २८५३ (०७-०४-२०२०). श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंजी (ता.राळेगांव, जि.यवतमाळ) येथे सन २०१३-१४ ते २०१६-१७ या वर्षात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व स्वच्छ भारत मिशन अंतर्गत वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकाच कुटूंबात एकापेक्षा जास्त शौचालय न बांधता तसेच एकच शौचालय बांधून दोन वेळा लाभ देणे, शौचालयातील शिट न बसविणे तसेच बांधकाम निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याने शे. नईम शे. रहीम रा.वाढोणाबाजार (ता.राळेगांव) यांनी याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांच्याकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२८-०८-२०२०) :** (१) होय.
(२) शे.नईम शे. रहीम रा.वाढोणाबाजार (ता.राळेगांव) यांनी तक्रार केली, ही बाब खरी आहे.
(३) गट विकास अधिकारी पंचायत समिती, राळेगाव व सचिव ग्रामपंचायत, आंजी यांनी तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन दिनांक ११/२/२०२० रोजी अहवाल सादर केला. सदर अहवालाच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, यवतमाळ स्तरावरुन दिनांक १२/०६/२०२० रोजी तक्रारीत नमूद ग्रामपंचायत, आंजी येथील ८६ वैयक्तिक शौचालये आहेत किंवा कसे, कोणत्या योजनेतून झालेत, त्यांची सद्यपरिस्थिती इत्यादी तपासणी करण्यात आली. दिनांक १२/६/२०२० रोजी केलेल्या चौकशीनुसार दिनांक १५/६/२०२० रोजी सरपंच, ग्रामसेवक तसेच गट विकास अधिकारी यांना पत्र देऊन दुरुस्तीची जी कामे होती ती पूर्ण करण्यात आली आहेत. तसेच स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत ग्रामपंचायत, आंजी मध्ये कोणालाही दुबार लाभ देण्यात आलेला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोकण पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत**

**(२४) ३६४३ (०७-०४-२०२०). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण पर्यटन संचलनायाअंतर्गत कोकण पर्यटन विकास समितीस स्वतंत्र लेखाशिर्ष मंजूर करुन १ हजार कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात येऊन कोकणातील पर्यटनाला बळ देण्याबाबत मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने गोवा पर्यटनाप्रमाणे कोकणातील पर्यटनाला चालना देण्यासाठी मागणी होत असलेल्या निधीची तरतूद करुन पर्यटन विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (२४-०८-२०२०) :** (१) कोकणातील पर्यटनाला बळ देण्याबाबत मागणी होत आहे, हे खरे आहे.

(२) राज्यातील विविध ठिकाणच्या पर्यटन विकासासाठी मुलभूत सुविधाकरिता सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी रु.९७९५६.५४ लक्ष इतक्या रक्कमेची तरतूद करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासनाच्या विविध भागातील कर्मचाऱ्यांना पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगातील वेतनाचा लाभ देण्याबाबत**

**(२५) ३७४६ (१६-०४-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) के.पी. बक्षी समितीने अद्याप शासनास अहवाल सादर न केल्यामुळे राज्य सरकारच्या विविध भागातील सुमारे ३० हजार कर्मचाऱ्यांना पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगातील वेतन आयोगाचा लाभ मिळू शकला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वरून ६० वर्षे करणेबाबत देखील बी.सी. खटुआ समितीने अद्याप शासनास अहवाल सादर न केल्यामुळे यावर निर्णय घेण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, के.पी. बक्षी व बी.सी. खटुआ समितीस शासनास अहवाल सादर करण्यास लागत असलेल्या प्रदिर्घ विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत व किती निश्चित कालावधीत अहवाल सादर होऊन सरकारी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्या सोडविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (०३-०९-२०२०) :** (१) हे खरे नाही. राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना ५ व्या आणि ६ व्या वेतन आयोगाचे लाभ यापूर्वीच अनुक्रमे दिनांक १ जानेवारी, १९९६ आणि दिनांक १ जानेवारी, २००६ पासून देण्यात आले आहेत.

के.पी. बक्षी समितीच्या (राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७) कार्यकक्षेत ७ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने सुधारित वेतन संरचनेची शिफारस करणे आणि ६ व्या वेतन आयोगाच्या वेतन संरचनेत त्रुटी असल्यास त्या दूर करण्याबाबत शिफारशी करणे, या दोन बाबी प्रामुख्याने अंतर्भूत होत्या.

यापैकी ७ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने सुधारित वेतन संरचनेच्या शिफारशींचा समितीचा अहवाल खंड-१ शासनास सादर होऊन दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून सुधारित वेतन संरचनेची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

६ व्या वेतन आयोगाच्या वेतन संरचनेतील त्रुटींसंबंधीच्या शिफारशींचा समितीचा अहवाल खंड-२ समितीने दिनांक २८ ऑगस्ट, २०१९ रोजी शासनास रोजी सादर केला होता. सदर अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने शासनाने समितीकडून अधिक स्पष्टीकरणात्मक माहिती मागविली आहे.

(२) अंशतः खरे आहे.

शासकीय कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वरून ६० वर्षे करणे योग्य ठरेल किंवा कसे, याबाबत सर्व दृष्टीकोनातून अभ्यास करून सर्वंकष अहवाल शासनास सादर करण्यासाठी दिनांक २४ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये श्री. बी. सी. खटुआ (सेवानिवृत्त भा. प्र. से. अधिकारी) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीने आपला अहवाल शासनास सादर केला असून सदर अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) आणि (४) बी. सी. खटुआ समितीने आपला अहवाल शासनास सादर केला असून सदर अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे.

तसेच के. पी. बक्षी समितीचे कामकाज प्रगतीपथावर आहे. मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ४ फेब्रुवारी, २०२० रोजी शासकीय कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात झालेल्या बैठकीत दिलेल्या निदेशांनुसार समितीने अहवाल खंड - २ लवकरात लवकर शासनास सादर करावा, असे समितीस कळविण्यात आले आहे. बक्षी समितीने २ मार्च, २०२० रोजीच्या पत्रान्वये अहवाल लवकरच सादर करण्यात येईल, असे कळविले आहे. समितीचा अहवाल प्राप्त होताच त्यावर उचित कार्यवाही करण्यात येईल.

---

### कोक, (ता.जिंतूर, जि.परभणी) जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी शालेय पोषण आहारापासून वंचित असल्याबाबत

**(२६) ३८८४ (०९-०४-२०२०). श्रीमती मेघना दिपक साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोक (ता.जिंतूर, जि.परभणी) जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना मागील काही महिन्यांपासून शालेय पोषण आहारापासून वंचित राहवे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेत पिण्याचे अशुद्ध पाणी, अस्वच्छता, सातत्याने खंडीत होणारा वीज पुरवठा यासह अनेक समस्यांना शिक्षक व विद्यार्थ्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर विषयासंबंधी जिल्हा परिषद, शिक्षण विभागाकडून कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंबंधी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२५-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना (जि.जालना) नगरपालिकामार्फत नागरिकांना नियमित पाणीपुरवठा करण्याबाबत**

**(२७) ३९४० (०५-०४-२०२०). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना (जि.जालना) नगरपालिकामार्फत नागरिकांकडून पाणीपट्टी व मालमत्ता कर आकारणी करूनही शहरातील नागरिकांना नियमित पाणीपुरवठा न करता किमान ६ ते ८ दिवसाच्या अंतराने पाणीपुरवठा केला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जालना शहरासाठी जायकवाडी प्रकल्पातून स्वतंत्र पाणीपुरवठा योजना कार्यान्वित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान सलग १५ दिवस पाणीपुरवठा न झाल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी जालना शहरातील नागरिकांना नियमित दररोज पाणीपुरवठा करणेबाबत जालना नगरपालिकेकडून कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०८-२०२०) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) जालना शहराला पाणी पुरवठा करण्यात येणाऱ्या पाईप लाईनवर पैठण जवळील नाल्यामध्ये जालना-जायकवाडी पाईप लाईन पैठण पासून २ कि.मी. अंतरावर सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांच्यामार्फत करण्यात येणाऱ्या पैठण-पाचोड रोडचे रुंदीकरण, तसेच पुलाचे बांधकामासाठी करण्यात आलेल्या खोदकामात मुख्य पाईपलाईन उघडी केल्यामुळे ९०० मी.मी. व्यासाचे मुख्य डी.आय. पाईप लाईन ६० ते ७० मीटर सरकल्यामुळे पाणी पुरवठा

खंडीत झालेला आहे. सदर पाईप लाईन जोडणीचे काम युद्ध पातळीवर चालू असून तद्नंतर सदर योजनेद्वारे मिळणाऱ्या पाण्यातून जुना जालना विभागास देखील ६ ते ८ दिवसांनी पाणी पुरवठा करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी, जालना यांनी अहवालात नमूद केले आहे.

(४) महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियान (राज्य स्तर) अंतर्गत जालना शहरातील अंतर्गत पाणी वितरण व्यवस्थेसाठी पाईप लाईन अंथरणे व जोडण्याचे काम सुरु असून, सद्यस्थितीत जालना शहरात वितरण व्यवस्थेचे पाईपलाईन अंथरण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच जालना शहरात प्रस्तावित डी.पी.आर. नुसार एकूण ९ जलकुंभ बांधण्याचे काम प्रस्तावित करण्यात आले असून त्यापैकी ७ जलकुंभाचे काम पुर्णत्वाकडे आहे.

सद्यस्थितीत जुना जालना भागातील आवश्यक त्या प्रभागामध्ये मागणीनुसार टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत असल्याबाबत जिल्हाधिकारी, जालना यांनी अहवाल सादर केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जालना शहरातील पथदिवे रात्रंदिवस सुरु असल्याबाबत

**(२८) ३९४१ (०५-०४-२०२०). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना शहरातील सुमारे १० हजार पेक्षा जास्त पथदिवे मागील ४ महिन्यांपासून दिवस व रात्र (२४ तास) वीज पुरवठा चालू असेपर्यंत सुरु असतात ही बाब दिनांक २२ जानेवारी, २०२० च्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिवसा आवश्यकता नसतानाही पथदिवे सुरु असल्यामुळे वीज बिलापोटी शासनाच्या निधीचा अपव्यय होतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार चौकशीत दोषी आढळून आलेल्या अधिकारी/कर्मचा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०८-२०२०) :** (१) अंशतः खरे आहे.

(२) जालना नगरपरिषदेने पथदिव्यांचा विज बचतीच्या अनुषंगाने जुने अपारंपारिक पथदिवे बदलून पारंपारिक एल.ई.डी. बसविले, त्यामुळे पथदिव्यांचा पूर्वीचा व सद्यस्थितीच्या विज देयकामध्ये वाढ झालेली नाही. तसेच पथदिवे चालू व बंद करण्याबाबतच्या प्रणालीचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मुख्याधिकारी, नगरपरिषद जालना यांना संबंधित एजन्सीचे देयक अदा करताना पथदिवे चालू राहत असल्याने होत असलेल्या भुर्दंडाबाबत, संबंधितांच्या देयकातून दंड आकारणी करुन वसूल करण्याबाबत सूचित करण्यात आले असल्याचे जिल्हाधिकारी, जालना यांनी अहवाल सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या अकरा गावांमधील शासकीय व ॲमेनिटी स्पेसच्या जागांबाबत**

**(२९) ३९४२ (०६-०४-२०२०). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत दोन वर्षापूर्वी नव्याने समाविष्ट झालेल्या अकरा गावांमधील सुविधा क्षेत्राच्या (Amenity Space) जागा अद्यापही महानगरपालिका प्रशासनाला ताब्यात मिळालेल्या नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पीएमआरडीए ची स्थापना झाल्यानंतर या सर्व गावातील सरकारी जमिनी जिल्ह्याधिकाऱ्यांनी पीएमआरडीएकडे हस्तांतरित केल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हाधिकारी, पुणे यांनी या सर्व जागा महानगरपालिकेच्या ताब्यात देण्यासाठी स्वतंत्र आदेश काढला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहु ११ गावांमधील शासकीय जमिनी व ॲमेनिटी स्पेसच्या जागा महानगरपालिका प्रशासनाकडे देण्याबाबत शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०८-२०२०) :** (१) व (२) जिल्हाधिकारी, पुणे यांनी दि.२३/०७/२०१५ रोजीच्या आदेशान्वये पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील प्रादेशिक योजनेतील अंतर्गत रस्ते, रस्ता रुंदीकरणातील वाढीव क्षेत्र, सुविधा क्षेत्र (Amenity Space) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचे नावे हस्तांतरित करणेबाबत ओदश निर्गमित केले आहेत. यानंतर दि.४ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या शासन आदेशान्वये, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील लोहगाव (उर्वरित), मुंढवा (उर्वरित केशवनगर), हडपसर (संपूर्ण साडेसतरा नळी), शिवणे (संपूर्ण उत्तमनगर), शिवणे, आंबेगाव खुर्द, उंड्री, धायरी, आंबेगाव बुद्रुक, फुरसुंगी, ऊरुळी देवाची ही ११ गावे पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत. सदर ११ गावांमधील ॲमेनिटी स्पेसच्या जागांच्या अधिकार अभिलेखात अद्यापही जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नावांची नोंद असून सदर गावे महानगरपालिका हद्दीमध्ये समाविष्ट झाल्याने सद्यस्थितीत सदर क्षेत्राचा ताबा पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे वर्ग करण्याची प्रक्रिया थांबविण्यात आली आहे. उपरोक्त दि.२३/०७/ २०१५ च्या आदेशानुसार पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे यांचेकडे शासनाच्या ताब्यात असलेले सुविधा भूखंड, अंतर्गत रस्ते, प्रादेशिक योजनांमधील क्षेत्र हस्तांतरीत करणेकामी पाठविण्यात आलेल्या प्रकरणांमध्ये हवेली तालुक्यातील पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांमधील प्रकरणांचा समावेश आहे.

(३), (४) व (५) सदरच्या मिळकती पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचे नांवे हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, पुणे यांनी निर्गमित केले असल्याने पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांमधील शासकीय जमीन व

ॲमेनिटी स्पेसच्या जागा पुणे महानगरपालिकेच्या नांवे हस्तांतरण करणेबाबतची कार्यवाही पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे यांचेकडून होणे आवश्यक आहे. ह्या ११ गावांच्या ॲमेनिटी स्पेसच्या जागा पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून अद्याप पुणे महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेल्या नाहीत. याबाबत पुणे महानगरपालिकेमार्फत जिल्हाधिकारी, पुणे व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडे पाठपुरावा सुरु आहे.

---

## पुणे शहरातील मेट्रो स्टेशनच्या पाचशे मीटरच्या परिसरातील टीओडी झोनच्या नियमावलीबाबत

**(३०) ३९४४ (२०-०३-२०२०). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील मेट्रो स्टेशनच्या पाचशे मीटरच्या परिसरातील टीओडी झोनच्या नियमावलीबाबत शासनाच्या नगरविकास आणि नगर रचना विभागामध्ये एकमत नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नियमावलीस शासनाने मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या नियमावलीबाबत राज्य शासनाने हरकती सूचना मागविल्या होत्या व त्यावर सुनावणी होण्याआधीच तिची अंमलबजावणी देखील सुरू करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासन कोणता निर्णय घेणार वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०८-२०२०) :** (१) व (२) अशी बाब नाही.

पुणे महानगरपालिकेच्या दि.०५/०१/२०१७ रोजीच्या मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०१७ मध्ये टीओडीच्या तरतुदी समाविष्ट आहेत. उक्त तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी काही तरतुदींमध्ये फेरबदल करणे आवश्यक असल्याचे शासनाचे मत झाल्याने सदर विनियमात बदल करण्यासाठी शासनाच्या नगरविकास विभागाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१कक) अन्वये सूचना क्र. टिपीएस-१८१८/प्र.क्र.८५/१८/ नवि-१३, दि.०८/०३/२०१९ प्रसिध्द केली आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१कक) अन्वये दि.०८/०३/२०१९ रोजीच्या सूचनेनुसार जनतेकडून हरकती/सूचना मागविण्यात आल्या होत्या. दरम्यान पुणे शहरात मेट्रो प्रकल्पाचे काम सुरु झालेले असल्याने टि.ओ.डी. विनियमाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी सदर विनियम तातडीने लागू करणे आवश्यक असल्याचे शासनाचे मत झाल्याने दि.०८/०३/२०१९ रोजीच्या प्रसिध्द सूचनेनुसार सुधारणा/तरतुदी तातडीने लागू करण्याबाबत शासनाने निर्णय क्र.टिपीएस-१८१८/प्र.क्र.८५/१८/ नवि-१३, दि.०८/०३/२०१९ अन्वये पुणे महानगरपालिकेस उक्त अधिनियमाच्या कलम १५४ अन्वयेचे निदेश दिले आहेत.

(४) व (५) प्रस्तुत प्रकरणी सर्व सूचना / हरकतदारांना सुनावणी देऊन व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन नियुक्त अधिकारी यांचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून त्यावर संचालक, नगर रचना यांचे अभिप्रायही प्राप्त झाले आहेत. सदर प्रस्तावावर कार्यवाही सुरु असून त्यावर गुणवत्तेवर अंतिम निर्णय घेण्याचे प्रस्तावित आहे.

---

**सोलापूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील विध्यार्थ्यांच्या गणवेशाबाबत**

**(३१) ४०२२ (०८-०४-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये विध्यार्थ्यांना दरवर्षी दोन गणवेश देण्यात येतात तथापि शासनाकडून निधीच्या अभावी दुसरा गणवेश दिला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १ लाख ४८ हजार ७६५ विद्यार्थी यांच्या अनुदानाची नस्ती जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे प्रलंबित असल्याचे निदर्शनास येत आहे, ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्व शिक्षा अभियानातून ८ कोटी ९२ लाख रुपये मंजूर आहेत परंतु दिनांक १२ जून २०१९ रोजी केवळ ४ कोटी ४६ लाख २९ लाख ५०० रुपयांचे अनुदान आले आहे, हे हीखरे आहे काय,

(४) असल्यास, उर्वरित अनुदान केंद्र व राज्य शासनाकडून अद्याप प्राप्त झाले नाहीत, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उर्वरित अनुदान मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास,

विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२५-०८-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) सन २०१९-२० मध्ये समग्र शिक्षा अंतर्गत मोफत गणवेश योजनेसाठी सोलापूर जिल्ह्यातील एकूण १,४८,७६५ लाभार्थ्यांकरिता रक्कम रु.८९२.५९/- लक्ष निधी मंजूर आहे. जिल्हा परिषद / महानगरपालिका स्तरावरील मागील वर्षाच्या शिल्लक असलेल्या निधीचा विनियोग करुन लाभार्थी विद्यार्थ्यांना गणवेश देण्याबाबत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने दिलेल्या सूचनेनुसार जिल्हा स्तरावरील शिल्लक निधीतून विद्यार्थ्यांना दोन गणवेशाचा लाभ देण्यात आला आहे.

---

**लोणीकंद (जि.पुणे) पोलीस स्टेशनच्या हद्दीत सुरु असलेल्या अवैध कामांबाबत**

**(३२) ४३१५ (२४-०३-२०२०). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणीकंद (जि.पुणे) पोलीस स्टेशनच्या हद्दीतील अवैध दारू केंद्रावर छापा मारून अवैध दारू व दारू बनविण्याचे साहित्य नष्ट केल्याची घटना माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पोलिस स्टेशनच्या हद्दीतील मटका, गुटखा, अवैध दारू व अवैध प्रवासी वाहतुकीमुळे नागरिक हैरान झाल्यामुळे त्यांच्या मागणीवरून ही कारवाई करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलीस स्टेशनच्या हद्दीतील अशा प्रकारचे अवैध धंदे बंद करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (०२-०९-२०२०) :** (१) होय हे खरे आहे.
(२) व ३) लोणीकंद पोलीस स्टेशनच्या हद्दीत अवैध धंद्यांवर कारवाई करण्यासाठी गोपनीय बातमीच्या अधारे माहे जानेवारी २०२० ते माहे जून २०२० अखेर खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

अ) अवैध दारु

| गुन्हे दाखल | आरोपी/अटक आरोपी | मुद्देमाल (रुपये) | मा.न्यायालयात दोषारोपपत्र |
|---|---|---|---|
| १२७ | १३०/५२ | ९,७८,१०१ | १६ |

आ) मटका जुगार

| गुन्हे दाखल | आरोपी/अटक आरोपी | मुद्देमाल (रुपये) | मा.न्यायालयात दोषारोपपत्र |
|---|---|---|---|
| ८ | ४८/४८ | १,७६,९७६ | तपासावर |

इ) गुटखा

| गुन्हे दाखल | आरोपी/अटक आरोपी | मुद्देमाल (रुपये) | मा.न्यायालयात दोषारोपपत्र |
|---|---|---|---|
| १ | १/१ | ३,७०० | तपासावर |

अवैध प्रवासी वाहतुकीबाबत ५ केसेस करण्यात आल्या असून सदरचे खटले मा.न्यायालयामध्ये पाठविण्यात आलेले आहेत.

अवैध धंदे बंद करण्याच्या दृष्टीने गोपनीय माहितीच्या आधारे माहिती मिळताच उपरोक्त प्रमाणे तात्काळ कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरात तसेच एस.टी. स्थानकांमधील चोरांचा बंदोबस्त करणेबाबत**

**(३३) ४३६३ (२४-०३-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील पीएमपी स्थानके तसेच एसटी स्थानकांमध्ये प्रवाशांकडील ऐवज लांबविण्याच्या गुन्ह्यांच्या संख्येत सातत्याने वाढ होत असून आठवड्यात किमान तीन ते चार तक्रारी वेगवेगळया पोलीस ठाण्यात दाखल होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पीएमपी बसमध्ये साध्या वेशातील पोलीस ठेवण्याचा निर्णय घेतल्यानंतरही प्रवाशांकडील ऐवज चोरी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या चोरांपासून प्रवाशांच्या सुरक्षेसाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (०२-०९-२०२०) :** (१) नाही.
सन २०१८ च्या तुलनेत सन २०१९ मध्ये गुन्हे दाखल होण्याचे प्रमाणात घट झालेली आहे. तसेच माहे जून २०२० मध्ये एकूण ६२ गुन्हे दाखल असून त्यापैकी २० गुन्हे उघड आहेत.
(२) पीएमपी व एस.टी. स्टँड परिसरात दैनंदिन पेट्रोलींगकरीता साध्या वेषातील कर्मचा-यांची नेमणूक करण्यात येत असल्याने गुन्हे घडण्याचे प्रमाणात घट झाली आहे.
(३) प्रवाशांच्या सुरक्षेसाठी विविध ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात आले आहेत. पोलीस ठाणे स्तरावर बीट मार्शल यांची नेमणूक केली आहे.
(४) विनाविलंब कार्यवाही करण्यात येते.

---

### सोलापूर जिल्ह्यात अन्नदिन व अन्नसप्ताहाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(३४) ४४८० (०७-०४-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यात शासनाने घोषित केलेल्या अन्नदिन व अन्नसप्ताहाची जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दुर्लक्षामुळे प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अन्नसप्ताहात पूर्ण वेळ दुकान सुरु ठेवणे आवश्यक असून प्रत्येक लाभार्थ्यापर्यंत धान्य वितरण होते की नाही याची खात्री अधिकाऱ्यांमार्फत होत नसल्यामुळे दुकानदारांकडून सदर घोषणेची अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२५-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.

सोलापूर जिल्ह्यात प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेस अन्नदिन व दि.८ ते २०१४ या कालावधीत अन्नसप्ताह साजरा करण्यात येतो. याबाबत रास्तभाव दुकानांच्या प्रसिद्धी फलकावर प्रसिद्धी देण्यात येते. त्याचबरोबर अन्नदिन साजरा केल्याबाबत फोटोही वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आले आहेत. याशिवाय महिन्याच्या ७ तारखेपूर्वी ७५% पेक्षा जास्त धान्य पोहोच होईल याचे नियोजन करण्यात येते.

(२) हे खरे नाही.

पूर्ण वेळ रास्तभाव धान्य दुकान चालू ठेवले आहे किंवा नाही याबाबत तालुक्यातील पुरवठा निरिक्षक यांना वैयक्तिक लक्ष देण्याबाबत सक्त सुचना यापूर्वीच देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजा तळेगांव (शा.पं.) (ता.आष्टी, जि.वर्धा) येथील श्री. नानकसिंग टेहलसिंग बावरी यांचेवर झालेला हल्ला**

**(३५) ४५८० (२४-०३-२०२०). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा तळेगांव (शा.पं.) (ता.आष्टी, जि.वर्धा) येथील श्री.नानकसिंग टेहलसिंग बावरी यांचेवर आरोपीने दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी जिव घेण्याच्या उद्देशाने हल्ला करून त्यांना मृत अवस्थेत सोडून आरोपीने पळ काढला असून त्याबाबत पोलीस स्टेशन तळेगांव (शा.पं.) यांनी सी.सी.टि.व्ही. फुटेजची तपासणी न करता कलम ३२४ नुसार गुन्हा दाखल केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सी.सी.टि.व्ही. फुटेजची तपासणी करून झालेल्या हल्ल्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (०२-०९-२०२०) :** (१) नाही.

फिर्यादी नानकसिंग टेहलसिंग बावरी यांचे तोंडी तक्रारी वरुन पो.स्टे. तळेगांव येथे अप. क्र.०६/२०२० कलम १४३, १४७, १४८, १४१, ३२४, ५०६ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याच्या तपासात सीसीटीव्ही फुटेज तपसण्यात आले असता त्यात दोन इसम फिर्यादीस मारहाण करतांना दिसून आले आहे. तसेच प्रत्यक्षदर्शी साक्षीदार विजयसिंग कलमसिंग टोक, जॉनीसिंग शेरसिंग टाक, गुरुदेवसिंग करतासिंग बावरी सर्व रा. तळेगाव (शा.पं.) यांचे जबाब नोंद करण्यात आले आहेत.

(२) गुन्ह्यातील सर्व आरोपीतांना दिनांक १३.०१.२०२० रोजी अटक करण्यात आली आहे. आरोपीतांनी गुन्ह्यात वापरलेली काठी जप्त करण्यात आली आहे. सी.सी.टीव्ही फूटेज जप्त करण्यात आले आहे. आरोपीतांना न्यायालयाने जामीनावर मुक्त केले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**आलेगाव (ता.पातूर, जि.अकोला) येथील एका सुशिक्षित बेरोजगार तरुणाची आर्थिक फसवणूक केल्याबाबत**

**(३६) ४८६१ (२५-०३-२०२०). श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आलेगाव (ता.पातूर, जि.अकोला) येथील एका सुशिक्षित बेरोजगार तरुणाची रुपये ३ लाखाचे कर्ज उपलब्ध करून देण्याच्या नावाखाली हजारो रुपयांनी फसवणूक करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त फसवणुकीबाबत गुन्हा दाखल करून संबंधीत दोषींना अटक करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (०२-०९-२०२०) :** (१) होय.
(२) नाही.
(३) आरोपीचा मोबाईल व बँकेत काढलेल्या खात्यावरुन शोध घेवुन तपास चालू आहे.
(४) गुन्हा दाखल असुन तपासावर आहे.

---

**मौजे सुंदरखेड (ता.जि.बुलढाणा) येथील श्री.संजयसिंग शिवसिंग राजपूत यांच्या शेतालगतचा रस्ता अडविल्याबाबत**

**(३७) ४९८३ (२५-०३-२०२०). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सुंदरखेड (ता.जि.बुलढाणा) येथील श्री.संजयसिंग शिवसिंग राजपूत यांच्या शेतालगतच्या भागात १०० ते १५० वर्षाच्या आधीपासूनचा सावळा ते सुंदरखेड रस्ता असून हा रस्ता तमिज मिर्झा नामक व्यक्तीने अडविला असून याबाबत तहसिलदार यांना दिनांक २२ जुलै, २०१९ व १७ सप्टेंबर, २०१९ रोजी लेखी निवेदन देऊन तक्रार करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत कोणतीही चौकशी वा कारवाई करण्यात आली नसून चौकशी न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या प्रकरणी शासन चौकशी करुन कारवाई करणार आहे काय ?

**श्री. बाळासाहेब थोरात (३१-०८-२०२०) :** (१), (२) व (३) श्री.संजय शिवसिंग राजपूत व इतर २, रा.सुंदरखेड यांनी सुंदरखेड ते सावळा शिवरस्ता नकाशाप्रमाणे मोकळा करून देण्याची विनंती तहसिलदार, बुलढाणा यांना दि.२२/०७/२०१९ रोजीच्या अर्जान्वये केलेली होती. त्यानुषंगाने तलाठी, माळविहीर व मंडळ अधिकारी, बुलढाणा यांनी प्रत्यक्ष जागेवर जावून मोका पाहणी केली असून मौजे माळविहीर येथील सुंदरखेड ते सावळा शिवरस्ता पंचासमक्ष खुला करून दिलेला आहे व त्याबाबतचा अहवाल दि. १७/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये तहसिलदार, बुलढाणा यांना सादर केलेला आहे.

---

**उजळंब व कबनसांगवी (ता.चाकूर, जि.लातूर) गावांना नियमित पाणीपुरवठा होण्याबाबत**

**(३८) ५०५८ (०७-०४-२०२०). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उजळंब व कबनसांगवी (ता.चाकूर, जि.लातूर) गावांसाठी राज्य शासनाने ग्रामीण भागातील नागरीकांना सुरळीत पाणी पुरवठा होण्याच्यादृष्टीने शासनाकडून सुरु करण्यात आलेल्या सौर उर्जेवर आधारित दुहेरी पंप जलवाहिनी पुरवठा योजना जिल्हा परिषदेअंतर्गत सहा वर्षापूर्वी कार्यान्वित करण्यात आली होती मात्र या दोन्ही गावांतील योजना चारच महिन्यात बंद पडल्यामुळे तेथील नागरीकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याने दिनांक १२ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत संबंधित ग्रामसेवक यांनी वरिष्ठांच्या आदेशानुसार १४ व्या वित्त आयोगातून अथवा ग्रामनिधीच्या माध्यमातून दुरुस्ती करुन घेण्याच्या सूचना दिल्या असून त्यानुसार लवकरच सदर बंद योजनांची दुरुस्ती करण्यात येईल असे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार तेथील नागरीकांना नियमित पाणीपुरवठा होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२१-०८-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) सदरील योजनेची चौकशी केली असता सोलार पंप पॅनल फुटल्यामुळे व इतर कारणामुळे बंद होती. मात्र याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद लातूर यांनी दिनांक २८/६/२०१९ रोजी सरपंच व ग्रामसेवक यांची बंद योजनेची बैठक बोलावून नादुरुस्त पंपाची दुरुस्ती १४ वा वित्त आयोग अंतर्गत उपलब्ध निधीतून दुरुस्ती करण्याबाबत सुचना दिल्या आहेत. यानुसार कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्ह्यात दिनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य विका
स योजना अयशस्वी ठरली असल्याबाबत**

**(३९) ५०८१ (१०-०४-२०२०). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यात प्रशासनाच्या अनास्थेमुळे शासनाची दिनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य विकास योजना अयशस्वी ठरली असून तीन वर्षात येथे फक्त १० ते १२ जणांना या योजनेमुळे नोकरी लागली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर योजना परिणामकारकपणे राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०५-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) सदर योजनेंतर्गत सांगली जिल्ह्यातील एकूण १५६ लाभार्थ्यांना प्रशिक्षण मिळालेले असून या सर्व लाभार्थ्यांना नोकरीच्या संधी ह्या प्रशिक्षण देणाऱ्या प्रकल्प अंमलबजावणी संस्थामार्फत दिलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महागांव (जि.यवतमाळ) तालुक्यातील धनोडा, फुलसावंगी व महागाव
शहरात गुटखा विक्री होत असल्याबाबत**

**(४०) ५३१७ (२५-०३-२०२०). श्री.नामदेव ससाने (उमरखेड), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागांव (जि.यवतमाळ) तालुक्यातील धनोडा, फुलसावंगी व महागाव शहरात आर्णी येथील प्रमुख गुटखा तस्कर गोट्या व त्याचा सहकारी यांनी ५० लाखांचा गुटखा विक्री करीता आणल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्णी तालुक्यामध्ये सर्रासपणे गुटखा विकला जात असून मटका काऊंटर पण सुरू आहेत व त्यांच्यावर कारवाई करण्यात येथील पोलिस प्रशासन दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (०२-०९-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

पोलीसांनी अवैध व्यवसायाबाबत वेळोवेळी गुप्त माहितीच्या आधारे छापा टाकून सन २०१९ व २०२० च्या माहे जून अखेर पर्यंत अवैध गुटखा व वरली मटका जुगाराविरुध्द खालीलप्रमाणे गुन्हे नोंदवून कारवाई केली आहे.

अ) अवैध गुटखाबाबत केलेली कारवाई

| वर्ष | एकूण गुन्हे | आरोपी संख्या | जप्त माल (रुपये) |
|---|---|---|---|
| २०१९ | ---- | ---- | ---- |
| २०२० माहे जून अखेर | २ | २ | १२,७६,९०० |

आ) वरली मटका जुगारावर केलेली कारवाई

| वर्ष | एकूण गुन्हे | आरोपी संख्या | जप्त माल (रुपये) |
|---|---|---|---|
| २०१९ | १४२ | १७९ | १,०४,३०५ |
| २०२० माहे जून अखेर | ३५ | ४६ | २२,४२५ |

(३) अन्न व औषध प्रशासन व पोलीस विभागाच्या समन्वयातून मागील तीन वर्षात पो. स्टे. महागांव हद्दीत खालीलप्रमाणे अवैध गुटखा जप्त करण्यात आला आहे.

| वर्ष | जप्त मुद्देमाल |
|---|---|
| २०१७ | एकूण ४ वेगवेगळ्या छाप्यामध्ये ३३,४९० रुपयाचा अवैध गुटखा जप्त |
| २०१८ | एकूण ३ वेगवेगळ्या छाप्यामध्ये ७४,४०० रुपयाचा अवैध गुटखा जप्त |
| २०१९ | एक छाप्यामध्ये ९,८०० रुपयाचा अवैध गुटखा जप्त |
| २०२० | एक छाप्यामध्ये ९,६० रुपयाचा अवैध गुटखा जप्त |

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लातूर जिल्हयात कासार सिरशी तालुका निर्माण करणेबाबत

**(४१) ५४०४ (२५-०३-२०२०). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निलंगा (जि.लातूर) तालुक्यातील विकासापासून वंचित राहिलेल्या व कर्नाटक राज्याच्या सीमेलगत असलेल्या परिसरातील जवळपास ७० गावातील नागरिकांच्या प्रशासकीय सोयीसाठी कासार सिरशी तालुका निर्माण करण्याबाबतची मागणी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी, औसा यांनी कासार सिरशी तालुका निर्माण करण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी झालेल्या विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद येथील मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या लातूर जिल्हा आढावा बैठकीत मागणी केली असून सदर मागणीला मा.मुख्यमंत्री महोदयांनी बैठकीत तत्वत: मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तालुका निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?.

**श्री. बाळासाहेब थोरात (३१-०८-२०२०) :** (१) होय.

(२) निलंगा तालुक्यात कासार शिरसी येथे तहसिल कार्यालय ३ दिवस चालू ठेवण्यासंदर्भात तपासून आवश्यक ती कार्यवाही करावी, असे निर्देश मा.मुख्यमंत्री महोदयांनी औरंगाबाद येथे झालेल्या जिल्हा आढावा बैठकीत दिले आहेत. त्यानुषंगाने विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांच्यामार्फत शासनास प्रस्ताव प्राप्त झाला असून त्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

(३) राज्यातील तालुक्यांच्या विभाजनाच्या अनुषंगाने निकष निश्चित करण्याकरीता विभागीय आयुक्त, कोकण यांचे अध्यक्षतेखाली गठीत तालुका पुनर्रचना समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे. सदर अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने तालुका विभाजनाचे निकष निश्चित करण्यासंदर्भात मंत्रीमंडळाच्या मान्यतेने धोरण ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

नवीन तालुका निर्मिती ही एक मोठी आर्थिक व प्रशासकीय प्रक्रिया असून खर्चिक बाब आहे. त्यानुषंगाने विविध पैलू तपासून त्यासंदर्भात मंत्रीमंडळाच्या मान्यतेने धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन तालुका निर्मितीसंदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अंबाजोगाई (जि.बीड) येथील स्वस्त धान्य दुकानदारांना पोत्यांमध्ये मिळणारे धान्य हे प्रमाणापेक्षा कमी मिळत असल्याबाबत

**(४२) ५९०१ (०७-०४-२०२०). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथील स्वस्त धान्य दुकानदारांनी गोदाममधून देण्यात येणा-या धान्य पोत्यांमध्ये ५० किलो ऐवजी ४२ ते ४४ किलोच धान्य मिळत असल्याची तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारीनूसार समाजसेवक श्री. नंदकिशोर मुंदडा यांनी स्वतः पाहणी केली असता गोदाम रक्षक, अंबाजोगाई उक्त बाब खरी असल्याचे मान्य केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंत्योदय योजनेंतर्गत स्वस्त धान्य देण्यात येत असतानाही गोदामातून देण्यात येणा-या पोत्यांमध्ये धान्य कमी मिळण्याचे कारण काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी दोषी असलेल्या संबंधित अधिकारी व कर्मचा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२६-०८-२०२०) :** (१) ते (४) अंबाजोगाई येथील शासकीय धान्य गोदामातील धान्याचे प्रमाणीकरण करतांना दुर्लक्ष झाल्यामुळे काही धान्य साठा अप्रमाणित राहिल्याने अशी बाब घडली आहे. सदर प्रकरणात नायब तहसिलदार, पुरवठा श्री.साळुंखे गोविंद व गोदामरक्षक वसिम शेख, अंबाजोगाई यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही सुरु करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. धान्य गोदाम कामकाजात निष्काळजीपणा करणाऱ्या एका हमालास कार्यमुक्त करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महागाव (जि.यवतमाळ) तहसिल कार्यालयातील कर्मचारी मुख्यालयात राहत नसल्याबाबत**

**(४३) ५९२२ (२७-०३-२०२०). श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महागाव (जि.यवतमाळ) तहसिल कार्यालयात तहसिलदार तसेच अधिकारी व कर्मचारी मुख्यालयात राहत नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. बाळासाहेब थोरात (३१-०८-२०२०) :** (१), (२) व (३) तहसिलदार, महागाव (जि.यवतमाळ) हे तहसिल कार्यालयाच्या आवारात असलेल्या शासकीय निवासस्थानातच २४ तास मुख्यालयी उपलब्ध असतात. श्री.एन.जे.इसलकर, निवासी नायब तहसिलदार यांना उपविभागीय अधिकारी कार्यालय, उमरखेड या कार्यालयात भूसंपादन विभागात प्रतिनियुक्तीवर घेण्यात आले आहे. तसेच इतर अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी हजर असतात.

---

**अमरावती जिल्ह्याचे विभाजन करून अचलपूर जिल्हा निर्माण करण्याबाबत**

**(४४) ६०५२ (२७-०३-२०२०). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्याचे विभाजन करून नवीन अचलपूर जिल्हा निर्माण करण्यात यावा अशी मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अचलपूर जिल्हा निर्मितीसाठी निकष निश्चित करण्यासाठी अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने दिनांक १३ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या अहवालानुसार मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव मांडण्यात येत असल्याचे महसूल मंत्री यांनी दिनांक ५ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिधीनींना पत्र पाठवून कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अचलपूर जिल्हा निर्मितीच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२८-०८-२०२०) :** (१) होय.
(२) व (३) राज्यातील अस्तित्वात असलेल्या जिल्ह्यांचे विभाजन/पुनर्रचना करण्यासाठी राज्यस्तरावर कोणते निकष विचारात घ्यावे, याबाबत अभ्यास करुन शासनास निकषांबाबत शिफारशी करण्यासाठी अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने शासनास दि.१६/११/२०१६ रोजी सादर केलेल्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने जिल्हा विभाजनाचे निकष निश्चित करण्याबाबत मंत्रीमंडळाच्या मान्यतेने धोरण ठरविण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरू असल्याबाबत मा.महसूल मंत्री यांच्या दि.५/१०/२०१७ च्या अर्धशासकीय पत्रान्वये संबंधित लोकप्रतिनिधीनी यांना कळविण्यात आले आहे.

जिल्हा निर्मिती ही एक मोठी आर्थिक व प्रशासकीय प्रक्रिया असून अत्यंत क्लिष्ट व खर्चिक बाब आहे. त्याअनुषंगाने विविध पैलू तपासून त्यासंदर्भात मंत्रीमंडळाच्या मान्यतेने धोरण निश्चित झाल्यानंतरच प्रकरणपरत्वे नवीन जिल्हा निर्मितीसंदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र राज्याला २०२०-२१ या आर्थिक वर्षात मिळालेल्या आर्थिक मदतीबाबत

**(४५) ६८९८ (१६-०४-२०२०). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र राज्याला २०२०-२१ या आर्थिक वर्षात ५२ हजार ४६५ कोटी रुपये एवढी मदत मिळाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मदतीचा कोणकोणत्या कामासाठी विनियोग करण्यात येणार आहे वा त्यानुषंगाने नियोजनाची सद्यःस्थिती काय आहे,
(३) असल्यास, अद्याप १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार उक्त निधी केंद्र शासनाकडून राज्य शासनास अद्याप मिळाला नसल्यास शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (०२-०९-२०२०) :** (१), (२) व (३) १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सन २०२०-२१ करीता केंद्र शासनाकडून केंद्रीय करातील निव्वळ हिस्सा ४१% राज्यांना देण्यात येणार आहे. या ४१% हिश्श्यापैकी ६.१३५% याप्रमाणे केंद्र शासनाकडून महाराष्ट्र राज्यास रु.४८,१०९ कोटी इतका हिस्सा अपेक्षित (अर्थसंकल्पीत) आहे. तसेच ग्रामीण

स्थानिक स्वराज्य संस्थांकरीता रु.५८२७ कोटी, शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांकरीता रु.२,८०६ कोटी व राज्य आपत्ती जोखीम व्यवस्थापन या बाबींकरीता रु.३,२२२ कोटी रक्कम मिळून रु.११,८५५ कोटी अपेक्षित आहे. सदर रक्कम व केंद्र हिश्श्याची रक्कम मिळून एकूण रु.५९,९६४ कोटी इतकी रक्कम प्राप्त होणे अपेक्षित आहे.

सदर निधी १ एप्रिल,२०२० ते ३१ मार्च, २०२१ या कालावधी करीता प्राप्त होणार आहे. यापैकी केंद्रीय करातील निव्वळ हिस्सा प्रतिमहा तर स्थानिक स्वराज्य संस्था व राज्य आपत्ती जोखीम व्यवस्थापनाकरीता दोन हप्त्यात निधी प्राप्त होणार आहे. त्यानुसार जुलै, २०२० पर्यंत केंद्रीय करातील निव्वळ हिस्सा रु.१०७९८.१५ कोटी प्राप्त झाले आहेत.

तसेच ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांकरीता रु.२९१३.५० कोटी, शहरी स्थानिक स्वराज्य संस्थाकरीता रु.३०५ कोटी व राज्य आपत्ती जोखीम व्यवस्थापनाकरीता रु.१६११ कोटी रक्कम असा एकूण रु.४८२९.५० कोटी पहिल्या हप्त्याचा निधी प्राप्त झाला आहे.

अशा प्रकारे १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासनाकडून जुलै, २०२० पर्यंत एकूण रु.१५,६२७.६५ कोटी निधी प्राप्त झाला आहे.

सदर निधीचा विनियोग पुढीलप्रमाणे आहे -

१. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था याकरीता प्राप्त होणारा निधी हा स्वच्छता आणि हागणदारीमुक्त स्थानिक स्वराज्य संस्थांची देखभाल व दुरुस्ती, पेयजल पाणीपुरवठा, पावसाच्या पाण्याची साठवण, जल पुनर्प्रक्रिया तसेच ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर्मचारी पगार तथा आस्थापना विषयक बाबी वगळून इतर स्थानिक गरजांनुसार आवश्यक बाबींवर खर्च करण्यात येणार आहे.

२. नागरी स्थानिक स्वराज्य संस्था याकरीता प्राप्त होणारा निधी विनियोगाचे धोरण ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

३. नैसर्गिक आपत्तीचे नियोजन करणे शक्य होत नसल्यामुळे आपत्ती व्यवस्थापनाकरीता प्राप्त होणा-या निधीचा विनियोग कोणकोणत्या कामासाठी करता येणार आहे हे निश्चितपणे सांगता येणार नाही. केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीपैकी अद्यापपर्यंत कोव्हीड-१९ तसेच निसर्ग चक्री वादळाच्या बाधितांना मदत देण्याकरीता निधी वितरीत करण्यात आला आहे.

(४) विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## जत (जि.सांगली) तालुक्याचे त्रिभाजन करण्याबाबत

**(४६) ७१०० (२७-०३-२०२०). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) तालुक्याचे त्रिभाजन किंवा माडग्याळ व उमदी येथे अप्पर तहसिलदार कार्यालय मंजूर करुन स्वतंत्र अधिकारी व कर्मचारी नियुक्त करावे याकरिता संबंधित विभागातील नागरिकांनी दिनांक माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान जत उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय लाक्षणिक उपोषण केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांगली जिल्हयात जत हा सर्वात मोठा तालुका आहे, त्यामुळे अनेक गांवाचा यामध्ये समाविष्ट करण्यात आला परंतू आवश्यक त्या सोयीसुविधे अभावी जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक होण्यात अडचणी निर्माण होत असल्यामुळे आवश्यक त्या सोयी सुविधा तसेच निधीचा पुरवठा जत तालुक्यास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२८-०८-२०२०) :** (१) जत तालुक्याच्या त्रिभाजनासह तालुक्यातील विविध मागण्यांसदर्भात शासनाचे लक्ष वेधण्यासाठी उपविभागीय अधिकारी, जत यांच्या कार्यालयासमोर संबंधित विभागातील नागरिकांनी दिनांक १.०१.२०२० रोजी एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण केले होते.
(२) सांगली जिल्ह्यातील जत तालुक्याची वाढती लोकसंख्या, मोठे क्षेत्रफळ, नागरीकरण, दुष्काळग्रस्त भाग इ. बाबींमुळे जत तहसिल कार्यालयावरील कामाचा ताण पहाता प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने तसेच जत तहसिल कार्यालय बळकट करण्याच्या दृष्टीने जत तालुक्यातील संख येथे स्वतंत्र अप्पर तहसिल कार्यालय स्थापन करण्यास शासन निर्णय क्र.प्राफेब२०१५/प्र.क्र.७१/म-१०,दि.१० ऑगस्ट, २०१७ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालेगांव (जि.वाशिम) शहरातील बस स्थानकातील गैरसोयी**

**(४७) ७३०७ (१०-०४-२०२०). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (जि.वाशिम) शहरातील बस स्थानकात प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे पेयजलाचा अभाव, तुटलेले संरक्षण कुंपण, स्वच्छतागृहाची दुरवस्था, बंद असलेले पथदिवे इ. समस्या असून परिणामी प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार प्रवाशांना येथे आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (२८-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) सदर बसस्थानकात प्रवाशांकरीता आसन व्यवस्थेसह भव्य प्रतिक्षालय, वाहतूक नियंत्रक कक्ष, तिकीट आरक्षण व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, लाईट, पंखे, पुरुष व महिलांकरीता स्वतंत्र प्रसाधनगृह, उपहारगृह, डांबरीकरण वाहनतळ इ.सुविधा उपलब्ध आहेत.

बसस्थानक व बसस्थानक परिसराची स्वच्छता ब्रिक्स इंडिया कंपनी, पुणे यांचेकडून करुन घेतली जाते. बसस्थानक आवारास तारेचे कुंपण असून, त्या ठिकाणी पक्की संरक्षक भिंत बांधण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात ऑनलाईन बेकायदा लॉटरीमुळे महसुलात होणारी घट**

**(४८) ८८१० (१४-०३-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रात बेकायदा ऑनलाईन लॉटरीमुळे राज्याच्या महसूलात होत असलेली घट रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यासाठी पश्चिम बंगाल सरकारने केलेल्या उपाययोजनाचा अभ्यास करण्यासाठी पोलीस व वित्त विभागाच्या अधिकाऱ्यांचे पथक पाठवून माहिती घेण्यात यावी असे निर्देश मा.उपमुख्यमंत्री यांनी दिनांक २२ फेब्रुवारी,२०२० रोजी वा त्या सुमारास प्रधान सचिव, वित्त यांना दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलीस व वित्त विभागाच्या अधिकारी पथकाची निवड झाली आहे काय,
(३) असल्यास, पथक केव्हा दौरा करणार आहे व अहवाल कधी शासनास प्राप्त होणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (०१-०७-२०२०) :** (१) होय.
ऑनलाईन लॉटरी संदर्भात मा. उप मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील दि.२२ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या बैठकीत मा. उप मुख्यमंत्री महोदयांनी निर्देश दिले आहेत.
(२) वित्त विभागाचे भारतीय प्रशासन सेवेतील प्रधान सचिव (ले. व को.) व आयुक्त, राज्य लॉटरी आणि भारतीय पोलीस सेवेतील प्रधान सचिव (विशेष), गृहविभाग व अतिरिक्त पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषन विभाग असे चार अधिकारी पश्चिम बंगाल राज्यास भेट देणार आहेत.
(३) वरील अधिकारी लवकरच दौरा करणार असून याबाबतचा अहवाल शासनास प्राप्त होणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे-नगर महामार्गावर वाघोली ते शिक्रापूरपर्यंत करण्यात येणाऱ्या सहा पदरीकरणामध्ये जमिन मालकांना मोबदला मिळण्याबाबत**

**(४९) १२००५ (१७-०७-२०२०). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-नगर महामार्गावर हायब्रीड ॲन्यूइटी अंतर्गत वाघोली ते शिक्रापूरपर्यंत करण्यात येणाऱ्या सहा पदरीकरणामध्ये जमिन मालकांना त्यांच्या जमिनीचा मोबदला म्हणून एफएसआय/टीडीआर स्वरुपात देण्यात यावा अशी मागणी नागरीकांकडून होत असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्याच्या रुंदीकरणामध्ये बाधित नागरिकांना मोबदला देण्याबाबत अद्याप कोणताही निर्णय घेण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मोबदला देणेबाबत शासनाची भूमिका काय आहे व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच माहे डिसेंबर, २०१९ अखेरपर्यंत या कामाची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (०३-०९-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) सदर रस्त्याचे सहापदरीकरण हे शासनाच्या उपलब्ध जागेत (Right of Way) मध्येच करण्यात येत असून कुठलीही अतिरीक्त जागा अधिग्रहीत करण्यात येणार नाही. सबब, जमिनीचा मोबदला टीडीआर स्वरूपात देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिखली (जि.बुलढाणा) मतदार क्षेत्रातील लघु मध्यम प्रकल्पांच्या कालवा व द्वार दुरुस्तीसह इतर कामे करणेबाबत

**(५०) १२६११ (१०-०८-२०२०). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखली (जि.बुलढाणा) मतदार क्षेत्रातील मेंडगाव लघुपाटबंधारे, कव्हळा लघुपाटबंधारे, मिसाळवाडी लघुपाटबंधारे, अंचरवाडी-१ व २, हिवरखेड-१ व २, पाटोदा, तेल्हारा, हराळखेड, ब्राम्हणवाडा, मासरूळ, शेकापूर लघुपाटबंधारे, पांग्रीकेसापूर लघुपाटबंधारे, झरी लघुपाटबंधारे, दहीद लघुपाटबंधारे, बोधेगाव लघुपाटबंधारे, मातला या प्रकल्पांचे कालवे व द्वार दुरुस्तीसह इतर कामे अनेक वर्षापासून करण्यात आली नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पांची कालवे व द्वार दुरुस्तीसह इतर कामे तातडीने करण्यात यावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी अधीक्षक अभियंता, बुलढाणा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, बुलढाणा तथा अधीक्षक अभियंता, अकोला सिंचन मंडळ, अकोला यांचेकडे दिनांक ११ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीनुसार या प्रकल्पांचे कालवे व द्वार दुरुस्तीसह इतर कामे करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०३-०९-२०२०) :** (१) होय.

(२) होय.

दि.११/०५/२०२० रोजीचे पत्र अकोला सिंचन मंडळ, अकोला या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

(३) तेल्हारा व मासरुळ या दोन लपा प्रकल्पांचे व्दार दुरुस्तीचे काम पुर्ण करण्यांत आले आहे.

मातला, झरी, अंचरवाडी-१ व मिसाळवाडी या चार प्रकल्पांची व्दारे सुस्थितीत आहेत.

उर्वरित लपा प्रकल्पांची व्दार दुरुस्तीची कामे सन २०२०-२१ च्या प्रापणसुचीत अंतर्भुत असुन मार्च-२०२१ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

कालवे दुरुस्तीची कामे आवश्यकतेनुसार नियमीत देखभाल दुरुस्ती अंतर्गत करण्यांत येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**

**मुंबई.** **सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.